पुण्य नगरी

# डोणजे येथे 'कृत्रिम बुद्धिमत्ता' कार्यशाळा उत्साहात

**खडकवासला :** पुण्यातील आघाडीच्या विश्वकर्मा विद्यापीठाच्या वतीने डोणजे येथील विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालयात आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शिक्षण अधिक गतिमान करण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग शिक्षणात, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात आपल्याला अतिशय महत्त्वाचा आहे. विशेषतः ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी हे एक उत्कृष्ट साधन ठरणार आहे. या विचारात 'कृत्रिम बुद्धिमत्ता'चा वापर करण्याचे विचार सर्वांत जरुरी आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सने शिक्षणाची नवीन कवाडे उघडली आहेत. शिक्षणाचे स्वरूप बदलत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना याबाबत अधिक जागृती व्हावी आणि पुढे जाऊन यामध्ये करिअर निवडता यावे यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. तसेच शिक्षकांनादेखील याचा वापर करून शिकवणे अधिकाधिक प्रभावी करता येईल यासाठी मार्गदर्शन केले.

प्रा. शेखर पायगुडे म्हणाले की, या स्पर्धेच्या युगात ग्रामीण विद्यार्थी मागे पडता कामा नये, नव्या संधींना आणि आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाता यावे हा कार्यशाळेचा उद्देश होता.

Pune Edition Edition

Jul 16, 2024 Page No. 03

Powered by: erelego.com